# राम आणि श्यामच्या अद्भुत साहसयात्रा

भारत सासणे



# राम आणि श्यामच्या अद्भुत साहसयात्रा

**भारत सासणे**

**छात्र प्रबोधन**
**ज्ञान प्रबोधिनी**
५१०, सदाशिव पेठ,
पुणे - ४११०३०.

♦ **राम आणि श्यामच्या अद्‌भुत साहसयात्रा' (अद्‌भुत–साहस कथासंग्रह)**
('छात्र प्रबोधन' या ज्ञान प्रबोधिनीद्वारा कुमारांसाठी प्रकाशित होत असलेल्या मासिकामध्ये २०२१ पर्यंत लेखकाच्या प्रकाशित झालेल्या कथांचा संग्रह)

♦ **प्रकाशक व मुद्रक**
प्रा. महेन्द्र सेठिया
संपादक, ''छात्र प्रबोधन',
ज्ञान प्रबोधिनी, पुणे 411030 ☎ (020) 24207 174/175
email - chhatraprabodhan@jnanaprabodhini.org
website - www.chhatraprabodhan.org

♦ **लेखक**
भारत सासणे
२०४, लक्ष्मी एन्क्लेव्ह, गणेशखिंड रस्ता,
मॉडेल कॉलनीजवळ, शिवाजीनगर, पुणे ४११०१६
मोबाइल – ९४२२०७३८३३ email - bjsasne@yahoo.co.in
© स्वामित्व मीना भारत सासणे यांच्या स्वाधीन

♦ **अक्षरजुळणी**
छात्र प्रबोधन,
ज्ञान प्रबोधिनी, पुणे ३०

♦ **मुखपृष्ठ व आतील चित्रे**
गिरीश सहस्रबुद्धे

♦ **शीर्षक लेखन** – बाबू उडुपी

♦ **वितरण**
छात्र प्रबोधन, ज्ञान प्रबोधिनी, पुणे ३०
ऑनलाइन खरेदीसाठी **jpprakashane.org**

♦ **प्रथम आवृत्ती :** राष्ट्रीय सौर पौष, शके १९४३, जानेवारी २०२२

♦ **किंमत:** ₹ १६०/-

***'Ram ani Shyamchya Adbhut Sahasyatra'***

**(Collection of Pre-published Exciting Fiction Stories from Chhatra Prabodhan Magazine for Youngsters published by Jnana Prabodhini)**

# प्रस्तावना

## राम आणि श्यामबद्दल थोडंसं... अर्थात, लेखकाचे दोन शब्द

माझ्या कुमारवयीन वाचक मित्र-मैत्रिणींनो! तसं पाहिलं तर, 'राम आणि श्यामच्या अद्भुत साहसयात्रां'च्या सुरस आणि रोचक कथा मी तुम्हाला सांगत आलो आहे बरीच वर्षं, हो, ना? 'छात्र-प्रबोधन'च्या दिवाळी वार्षिकातून त्या प्रकाशित होतायत. या 'जोडगोळी'बद्दल मला बरीचशी विचारणाही होत असते तुमच्याकडून. 'इमेल' वगैरेचा उपयोग करीत असता ना नाहीतरी आजकाल तुम्ही! तर, तुमची चौकशी अशी की, आता राम-श्याम काय करतायत? ते अगदी तरुण झाले असतील दरम्यानच्या काळात. मग त्यांच्या अलीकडच्या आणि नव्या साहसयात्रांच्या कथा केव्हा सागंणार?

त्या दोघांच्या नव्या कथांबद्दल काही सांगण्यापूर्वी राम आणि श्याम या जोडगोळीबद्दल थोडी माहिती देतो पुन्हा. ही कुमार वयोगटातली-तुमच्याच वयाची मुलं आहेत. दोघेही चुलत बंधू. दोघांना साहसाची आवड. तसे दोघे बुद्धिमान आणि चतुर. त्यातला एक म्हणजे श्याम-अगदी बुद्धिवादी, तर्कनिष्ठ. आजच्या तुमच्या मराठी भाषेत सांगायचं तर अगदी *'जीनियस आणि शार्प'*, तर दुसरा व्यायाम करणारा. जरा दांडगा-*'मस्क्युलाईन'*. 'कुंग-फू'चा चाहता, *'ब्लॅकबेल्ट होल्डर'*! कितीतरी प्रकरणांत ऐन संकटाच्या वेळी रामची 'प्रसिद्ध किक्' मदतीला धावली आहे, उपयोगी ठरली आहे (वाचालच तुम्ही). दोघेही डॉ. गरुड या आंतरराष्ट्रीय कीर्तीच्या संशोधकांचे साहाय्यक. त्यांच्या रोमहर्षक, अफलातून आणि अद्भुत मोहिमांमधून आपले राम आणि श्याम भाग घेत असतात. या त्या मोहिमांच्याच कथा आहेत.

पण थांबा! लेखक या नात्याने या कथा मला प्राप्त होण्यामागची अगदी *'थ्रिलिंग'* कथा सांगायचीय तुम्हाला. झालं असं की, तुमच्यासारख्याच कुमार मित्र-मैत्रिणींनी मला अगदी भंडावून सोडायला सुरुवात केली. त्यांचं सांगणं असं की राम आणि श्याम *'रिअल'* आहेत.

''*रिअल*' म्हणजे?''

''म्हणजे *रिअल!*... तुमच्या अवघड मराठीत सांगायचं म्हणजे अंऽऽ, वास्तवातले! खरे-खुरे!''

''खरे-खुरे? *रिअल.*''

''येस्!''

''म्हणजे?''

''म्हणजे ते आहेत! खरेच आहेत!''

मी मराठीत विचारलं, ''म्हणजे, तुला म्हणायचंय की ते *एग्झिस्टंस्मध्ये* आहेत?''

''होऽऽय!''

पुढे मग तो पुतण्या मला सांगायला लागला. त्याचं आणि कुमार मित्रांचं म्हणणं असं की राम आणि श्याम यांनी त्यांच्या मोहिमांबद्दल-त्यांच्या *'मिशन्स्'*बद्दल (माझ्या-लेखकाच्या-भाषेत 'साहसयात्रां'बद्दल) लिहून ठेवलंय.

''काय? खरंच?''

''होऽ! तुम्ही तर काकाऽ, लेखक आहात ना!... तुम्ही शोध घ्याऽ! त्या वहीचा!''

माझा विश्वास बसत नाही पाहिल्यानंतर त्यांनी सरसावून सांगायला सुरुवात केली की, राम आणि श्याम यांनी *'बिगफूट'*ला पाहिलंय. झालंच तर ते चेटकिणीच्या गुहेत उतरलेत. पंख असलेला माणूस त्यांनी पाहिलाय. डॉ. गरुडांबरोबर भटकंती केलीय आणि भुताच्या किल्ल्यात राहिलेत आणि होऽ! त्यांनी उडत्या तबकड्या-*यूएफओ* देखील पाहिल्यात. अगदी अलीकडेच त्यांचं परग्रहावरच्या माणसाशी अगदी समक्ष *'एन्काउंटर'* झालाय.

''काय?''

''खोटं नाही!... तुम्ही शोध घ्याऽ...!''

त्या कुमार-मित्रांच्या आग्रहानुसार मी कामाला लागलो. एका पुतण्याने म्हटलं, ''तुम्ही जाल ना त्यांच्याकडे?''

''हो! का, रे?''

''ते म्हणे गायब झालेत... *व्हॅनिश... व्हॅनिश!*''

''*व्हॅनिश?*... कुठे?''

''ते *बिग-बुकच्या* शोधात होते डॉ. गरुडांबरोबर-''

'*'बिग-बुक?"*

त्याने आश्चर्याने माझ्याकडे पाहिलं. अविश्वासाने पाहिलं.

''*बिग-बुक* माहीत नाही?''

''नाही, रे!''

''खरंच माहीत नाही?''

त्याच्या डोळ्यात दया उत्पन्न होऊ लागली. मी म्हटलं,

''सांग, तूच!''

पुतण्याला नीट सांगता येईना. शब्दांची जुळवाजुळव करीत तो म्हणाला, ''काही शेकडो वर्षांपूर्वी परग्रहावरची माणसं पृथ्वीवर आली होती–''

''अं?''

''होऽ! आणि पुढच्या पिढीसाठी त्यांनी त्यांचं *नॉलेज* लिहून ठेवलं... पण त्यांच्या भाषेत!... आपल्याला वाचता येत नाही पण काहीतरी लिहिलंय–''

''अरे पण मग ते *बिग–बुक* आहे कुठे आणि शिल्लक कसं राहिलं?''

''ती कॉपी आहे, हाताने केलेली!... जशीच्या तशी!... *अ डिट्टो कॉपी ऑफ् इट्, यू नोऽ!!*... हे काम तिबेटच्या मठातून गुप्तपणे होत असतं अजून!''

''मग राम आणि श्याम...''

''त्याच पुस्तकाच्या–*बिग–बुकच्या ॲडव्हेंचरवर* गेलेत आणि अजून त्यांचा पत्ता नाही म्हणे... तुम्ही जाल ना?''

''त्यांच्या शोधासाठी?''

''नाही! त्यांच्या घरी–''

माझं कुतूहल जागं झालं. एक तर मी लेखक. शोध घेणं माझं काम आहे आणि इकडे पुतणे आणि पुतण्या, भाचे आणि भाच्या, इतके कुमारवयीन मित्र–मैत्रिणी मला सांगतायत तर शोध घेतलाच पाहिजे म्हणून मग मी गेलो शोध घेत, पत्ता विचारीत, त्या गावात.

त्या गावात ते घर सापडलं. तिथं खरंच राम आणि श्याम राहत होते. तिथे एक आत्याबाई होत्या. त्या काळजीत होत्या. डॉ. गरुडांबरोबर राम आणि श्याम गेलेत पण अजून आले नाहीत म्हणाल्या. मी त्यांना धीर दिला. येतील असं म्हटलं आणि त्यांची खोली कोणती आहे, पाहता येईल का, असं विचारलं.

खोली मुलांची असावी तशी होती. राम बुद्धिवादी होता म्हणून त्याचा *'चेस–बोर्ड'* सापडला. पुस्तकं सापडली, इंग्रजीही, मराठीही आणि श्यामची *बॉक्सिंग ग्लोव्हस्, स्पोर्ट बूट* आणि कुंग–फूमधली *मेडल्स* दिसली. या सगळ्यातून त्यांची व्यक्तिमत्त्वं स्पष्ट होत होती. जो मुद्दा आहे ना, महत्त्वाचा त्याबद्दल

सांगतो आता.

तर, तिथं खरंच त्यांची वही सापडली! त्यात त्यांनी त्यांच्या हकीकती लिहून ठेवल्या होत्या. त्यांच्या मोहिमांचे वृत्तांत लिहून ठेवले होते. वैशिष्ट्य असं लक्षात आलं की, या सत्यकथा-'एका आड एक' अशा लिहिल्या होत्या. म्हणजे, एक कथा रामने लिहिली होती तर दुसरी श्यामने. दोघांच्या शैली वेगळ्या. *'स्टाईल्स'* वेगळ्या. अक्षरं वेगळी; पण कथांमध्ये विलक्षण वाचनीयता होती. उत्साह होता. ऊर्जा होती. या पुस्तकात याच कथा आहेत. लेखक म्हणून मी थोड्या शुद्धलेखनाच्या दुरुस्त्या केल्या आहेत, इतकंच; पण बाकी या कथा जशाच्या तशा आहेत; त्याच क्रमाने राम आणि श्यामने सांगितलेल्या आणि आता ती दोघं 'गायब' आहेत, बेपत्ता आहेत.

आत्याबाईंनी मला सांगितलं की एक पार्सल मात्र आलंय त्यांच्याकडून काल.

''पार्सल? राम-श्यामकडून?... बघू!''

त्यांनी पोस्टाने पाठवलेलं पार्सल दाखवलं मला. पार्सल आलं होतं राजस्थानवरून; उदयपूरवरून. त्यातून त्यांनी *'बिग-बुक'च्या* मोहिमेचा रोमहर्षक, *'एक्सायटिंग'* असा वृत्तांत लिहिला होता. एकच अडचण होती, कथा अपूर्ण होती, अर्धवट होती. अगदी ऐन धुमश्चक्रीच्या वेळेला, अगदी *'क्लायमॅक्स'*च्या प्रसंगी नेमकी पुढची पानंच जोडलेली नव्हती आणि शेवटचं पान तर थोडं शेवटी फाटलेलंही होतं. काय झालं असावं? मला अंदाज येईना. जरा चिंताही वाटायला लागली. या आपल्या पुस्तकातही शेवटची, *'बिग-बुक'ची* कथा अपूर्णच छापलीय जशी मिळाली तशी!

आता कथेच्या शेवटाचं काय करायचं? तर, हे काम मी आता तुमच्यावर सोपवतो आहे. तुमच्यावर म्हणजे कुमार वाचक मित्रांवर! तुम्ही या अपूर्ण कथेचा शेवट लिहायचा आहे.

छात्र-प्रबोधनच्या संपादकांचं म्हणणं असं आहे की, कुमारवयीन मुलांनी त्यांचं वाचन तर वाढवलं पाहिजेच; पण त्यांनी 'लिहिलं'ही पाहिजे. म्हणून संपादक महाशयांनी ही योजना आखली आहे. तुम्ही *'बिग-बुक'* या अपूर्ण कथेचा शेवट लिहून छात्र-प्रबोधनकडे पाठवायचा आहे. पहिल्या तीन कथांचे शेवट छात्र-प्रबोधनमध्ये छापले जातील. अन्य 'शेवटा'बद्दलही अंकातून परीक्षकांमार्फत लेख लिहिला जाईल.

पण; खऱ्या शेवटाचं काय? हो, ना? आणि राम आणि श्याम यांचं काय झालं? असंच विचारायचंय ना, तुम्हाला?

थांबा! चिंता करू नका. राम-श्याम आपली मोहीम यशस्वी करून सुखरूप परत आले आहेत. त्यांची आणि माझी भेट पण झाली आहे आणि वहीतली शेवटची पानंसुद्धा मिळवली आहेत त्यांच्याकडून!

हा शेवट, म्हणजे श्यामने लिहिलेला शेवट, याच पुस्तकात छापलाय खरा, पण तो जो 'क्यू-आर-कोड' आहे ना, तो विशिष्ट मुदतीपूर्वी '*ॲक्टिव्हेट*'च होणार नाही. त्या नंतर मात्र तुम्हाला खरा शेवट याच पुस्तकातून वाचता येईल 'क्यू-आर-कोड' *ॲक्टिव्हेट* करून.

तर मग, तुमच्या सर्वांच्या आग्रहाप्रमाणे राम आणि श्याम यांची वही मी मिळवली. यातल्या 'अद्‌भुत साहसयात्रा' या पुस्तकात सादर केल्या आहेत. आता वाचा!! आणि अखेरच्या साहसकथेचा शेवट लिहून काढा. त्या कथेतच सगळे '*क्ल्यू*' आहेत.

आणि राम आणि श्याम आंतरराष्ट्रीय मोहिमांमध्येही गुंतलेले असतात म्हणून त्यांचा आणि डॉ. गरुडांचा पत्ता-*पोस्टल ॲड्रेस* काही मला तुम्हाला देता येणार नाही, गोपनीयतेचा भाग म्हणून! पण माझ्या पत्त्यावर तुम्ही त्यांना पत्रे पाठवू शकता. कदाचित त्यांच्याकडून उत्तरंही रवाना होतील तुम्हाला.

हे पुस्तक प्रकाशित करण्याचं छात्र-प्रबोधनच्या संपादकांनी ठरवलं आणि देखण्या स्वरूपात प्रकाशित केलं याबद्दल मी त्यांचा आणि त्यांच्या सगळ्या सहकाऱ्यांचा अतिशय आभारी आहे.

वाचा तर मग, राम आणि श्यामच्या या अद्‌भुत साहसयात्रा!

**– भारत सासणे**

# साहसयात्रेचे अंतरंग


१. अद्‌भुत साहसयात्रा .................................... १३

२. यक्षिणीच्या गुहेतली अद्‌भुत साहसयात्रा! .................. २४

३. 'बिग फूट' आणि आमची अद्‌भुत साहसयात्रा............. ३९

४. अंतरिक्षातील अग्निगोल ................................ ५१

५. राजेसाहेबांचे भूत ........................................ ६६

६. पंख असलेला माणूस! .................................. ८५

७. राम श्याम आणि परग्रहावरचा माणूस.................. १०१

८. द बिग बुक! ♠ ........................................ १२४


**कथेच्या शेवटी दिलेला क्यू आर कोड स्कॅन करा.**

(त्यासाठी गूगल प्ले स्टोअरवरून क्यू आर कोड स्कॅनर हे ॲप डाउनलोड करा.)

♠ कथापूर्ती ! सर्वोत्कृष्ट कथापूर्ती १५ मे २०२२ नंतर वाचा!